माहितीचा अधिकार

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ / ३९६४ / २०२५ / सातारा.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| विष्णू दत्तात्रय बर्वे | कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>सातारा, जि. सातारा | तालुका कृषि अधिकारी,<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>सातारा, जि. सातारा |

**( सुनावणी दिनांक - १९ / ०५ / २०२६ )**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे दि. २३.०९.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी समक्ष हजर आहेत, विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तसेच विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी ऑनलाईन हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणी, अपीलार्थी यांनी माहिती अर्जात जन माहिती अधिकारी यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| १६.०६.२०२५ | रोजगार हमी अंतर्गत शेतकऱ्यांना कोणकोणते लाभ मिळतात याची व इतर ६ मुद्दयांची माहिती मिळणेबाबत. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी कथन केले की, “जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही.”

जनमाहिती अधिकारी यांनी अवगत केले की, “अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०८.०७.२०२५ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे कळविले आहे.”

उपलब्ध अभिलेखावरून दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहिती अर्जास दि. ०८.०७.२०२५ रोजीच्या पत्राने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचे कळविले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपील निकाली काढले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती केवळ प्रश्नार्थक स्वरुपाची आहे, या कारणास्तव नाकारने उचित नाही.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आदेश</u>

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालय सातारा, जि. सातारा यांना याप्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थी यांच्या जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असणारी व विहीत तरतूदीनूसार देय होणारी माहिती / वस्तुनिष्ठ उत्तर आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७ (६) नुसार नोंदणीकृत टपालाने विनामुल्य उपलब्ध करून द्यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

29.5.26

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.३९६४ / २०२५ / सातारा. 2470/2026 दिनांक - 1/6/2026.